**प्रसिद्धिपत्रक**

**महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी लघुलेखन परीक्षेची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे :-**

**१. भाषा संचालनालयाची मराठी लघुलेखन परीक्षा**

इंग्रजी लघु-टंकलेखक, निम्नश्रेणी व उच्चश्रेणी लघुलेखक यांच्यासाठी **शुक्रवार, दिनांक २४ एप्रिल, २०२६** रोजी मराठी लघुलेखन परीक्षा मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय ठिकाणी घेण्यात येईल. लघुलेखन परीक्षेला अर्ज करणाऱ्या उमेदवारांना त्यांच्या कार्यालयाने परीक्षेच्या किमान १ महिना अगोदर लघुलेखनाचे श्रुतलेखन घेऊन सराव करण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच लघुलेखन परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांच्या सरावासाठी श्रुतलेखनाची ध्वनीफीत भाषा संचालनालयाच्या **directorate.marathi.gov.in** या संकेतस्थळावरील मुख्य पृष्ठावर **"लघुलेखनाचे श्रुतलेखन"** या पर्यायावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मराठी टंकलेखन व मराठी लघुलेखन परीक्षेसाठी वेगवेगळी आवेदनपत्रे कार्यालय प्रमुखांमार्फत पाठवावीत. **परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी सदर आवेदनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव, कार्यालयाचा पूर्ण पत्ता (पिन कोड क्रमांकासह ) मोबाईल क्रमांकासह आवेदनपत्र परिपूर्ण भरून मूळ चलनासह दि. १८ मार्च, २०२६ पर्यंत खाली नमूद केलेल्या संबंधित कार्यालयांकडे विहित मुदतीत पाठविणे आवश्यक आहे.** तसेच या परीक्षेची कार्यक्रमपत्रिका परीक्षेपूर्वी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

**विभागीय कार्यालयांचे पत्ते**

**मुंबई व कोकण विभाग**
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
कोकण भवन, ३ रा मजला,नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५७३५४२

**पुणे व नाशिक विभाग**
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत,२ रा मजला, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२१७०९

**नागपूर व अमरावती विभाग**
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
प्रशासकीय इमारत क्र.१, २ रा मजला,
सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६४९५६

**छत्रपती संभाजीनगर विभाग**
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
जुने जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर,
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३६१३७२

**भाषा संचालक,**
**महाराष्ट्र राज्य.**

**ठिकाण :- मुंबई.**
**दिनांक :-** २४/२/२०२६.